# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-३७

जा.क्र. प्रशा/व्य.मं./२०१६/२२४१ ०२/०२/२०१६

**कार्यवृत्तांत**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची सभा गुरुवार दि. १४ जानेवारी २०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे-३७ येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. दीपक ज. टिळक, कुलगुरु (अध्यक्ष)
२. डॉ. गीताली हृषिकेश मोने-टिळक
३. डॉ. मा. चिं. दीक्षित
४. डॉ. श्री. ग. बापट
५. डॉ. श्रीपाद भट
६. डॉ. माधवी रेणावीकर
७. श्रीमती सरिता साठे
८. डॉ. श्रीनिवास कुलकर्णी
९. डॉ. अभिजीत जोशी, प्रभारी कुलसचिव

डॉ. बा. शि. दामले, डॉ. हेमंत अभ्यंकर, डॉ. विजय नारखेडे, सौ. प्रणति टिळक, डॉ. स. प्र. सरदेशमुख, श्री. हर्षद निंबाळकर, डॉ. शशिकांत लोखंडे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत.

१. व्यवस्थापन मंडळाची मागील सभा दि. २० नोव्हेंबर २०१५ रोजी झाली. त्या सभेचा कार्यवृत्तांत संमत करणे. (कार्यवृत्तांत प्रत दि. २१ नोव्हेंबर २०१५ रोजी पाठविण्यात आली आहे.)

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१</u>**

कार्यवृत्तांत संमत करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा नियमांची पूर्वलक्षी प्रभावाने दि. १ जून २०१० पासून अंमलबजावणी करणे. (शिक्षकेतर सेवकांच्या नियमांसंदर्भात महाराष्ट्र शासनाने अकृषी विद्यापीठांतील शिक्षकेतर सेवकांसाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम अन्वये विहीत केलेल्या सेवानियम, अटी व शर्ती या सर्व शासनमान्य शिक्षकेतर सेवकाना महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमधील सेवानिवृत्तीनंतरचे फायदे आणि वेतनश्रेणीबाबतचे नियम वगळून इतर सर्व नियम लागू करण्यास मान्यता देण्यात यावी.)

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-२</u>**

महाराष्ट्र शासनाने अकृषी विद्यापीठांतील शिक्षकेतर सेवकांसाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम अन्वये विहीत केलेल्या सेवानियम, अटी व शर्ती या सर्व शासनमान्य शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकाना महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमधील सेवानिवृत्तीनंतरचे फायदे आणि वेतनश्रेणीबाबतचे नियम वगळून इतर सर्व नियम मान्य करण्यात येत आहेत. सदर नियमांची पूर्वलक्षी प्रभावाने दि. १ जून २०१० पासून अंमलबजावणी करावी.

तसेच, शासनअमान्य सेवकांसाठी अशाप्रकारचे नियम अथवा कायदे विद्यापीठाने स्वतंत्र करावेत.

३. डॉ. उमेश केसकर यांना निलंबन कालावधीत देण्यात येणाऱ्या वेतनाबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-३</u>**

वेतनापोटी ५० टक्के रक्कम शासनाकडून नियमाप्रमाणे घेण्यात यावी आणि उर्वरित ५० टक्के रक्कम सध्या विद्यापीठ फंडातून देण्यात यावी.

४. श्री. मंदार गितापाठी यांना विद्यापीठ सेवेतून काढले असल्याची नोंद घेणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-४</u>**

नोंद घेतली.

५. विद्यापीठात दोन वर्षाचा एल्.एल्.एम्. अभ्यासक्रम चालू करण्याविषयी विद्यापीठ अनुदान आयोगास प्रस्ताव पाठविणेबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-५</u>**

एल्.एल्.एम्. अभ्यासक्रम चालू करण्याविषयी विद्यापीठ अनुदान आयोग/महाराष्ट्र शासन यांचेकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव पाठविण्यात यावा.

६. खारघर, नवी मुंबई येथे बी.एफ.ए. अभ्यासक्रम सुरु करणेबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-६</u>**

खारघर, नवी मुंबई येथे बी.एफ.ए. (डिजीटल) अभ्यासक्रम सुरु करण्यात यावा.

७. विद्यापीठातील शासनमान्य रिक्त पदांबाबत विचार करणे. रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडे विद्यापीठाने पाठपुरावा करणे, पदांना मंजूरी मिळण्यास विलंब होत असल्यास विद्यापीठाने अशी पदे स्वबळावर भरणेबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-७</u>**

विद्यापीठातील शासनमान्य रिक्त पदे भरणेबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा. सदरची खालीलप्रमाणे पदे मंजूर होण्यास विलंब होत असल्यास विद्यापीठाने ती स्वबळावर आवश्यक ती सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन भरावीत.

| | |
|---|---|
| सहायक कुलसचिव - १ | पर्यवेक्षक - १ |
| वरिष्ठ लिपीक - १ | लघुलेखक - १ |

८. रिहे येथील जागेत विद्यापीठ कार्यक्रमांकरीता आवश्यक असलेल्या मैदानाकरीता न्यासाकडे मागणी करणेबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-८</u>**

रिहे येथील जागेत विद्यापीठ कार्यक्रमांसाठी आवश्यक असलेल्या मैदानाकरीता विद्यापीठ न्यासाकडे मागणी करण्यात यावी.

९. श्री. सुहास शिंदे यांना विद्यापीठ सेवेत परत घेण्याबाबत उच्चशिक्षण संचालनालय पुणे यांचेकडून आलेल्या पत्राबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-९</u>**

श्री. सुहास शिंदे यांचेकडून गैरवर्तणूक न करण्याबाबत लेखी हमीपत्र तसेच माफीनामा घेण्यात यावा आणि शासनाच्या नियमांप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

१०. मा. कुलपती यांच्या पुढील पाच वर्षाच्या कालावधीच्या नियुक्तीची नोंद घेणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१०</u>**

नोंद घेण्यात आली. उपस्थित सदस्यांनी अभिनंदन करुन नियुक्तीच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

११. विद्यापीठाचा २७ वा पदवीप्रदान समारंभ शनिवार दि. ५ मार्च २०१६ रोजी आयोजित करणे आणि समारंभाचे नियोजन करणेबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-११</u>**

विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभाच्या नियोजनाबाबत मा. कुलगुरुंना अधिकार देण्यात येत आहेत.

१२. विद्यापीठाचे हरित लेखापरिक्षण (Green Audit) करुन घेणेबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१२</u>**

राष्ट्रीय मुल्यांकन आणि अधिस्विकृती परिषद (नॅक) यांचे निर्देशानूसार विद्यापीठाचे हरित लेखापरिक्षण(Green Audit) करुन घेण्यात यावे.

१३. व्यवस्थापन विद्याशाखांतर्गतच्या बी.बी.ए. सत्र ६ च्या अभ्यासक्रमामधील माहिती-तंत्रज्ञान हा विशेष विषय पुनर्रचित करण्याबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१३</u>**

व्यवस्थापन विद्याशाखांतर्गतच्या बी.बी.ए. सत्र ६ च्या अभ्यासक्रमामधील माहिती-तंत्रज्ञान हा विशेष विषय पुनर्रचित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४. खारघर नवी मुंबई येथे लोकमान्य टिळक कॉलेज ऑफ फिजीओथेरपी सुरु करण्याबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१४</u>**

महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार आणि भौतिकोपचार परिषदेच्या मान्यतेकरीता विद्यापीठातर्फे अर्ज करण्यात यावा.

१५. डॉ. धनिष्ठा खंदारे, ग्रंथपाल यांचे दि. ४ जानेवारी २०१६ चे पत्र विचारार्थ. (पत्रात त्यांनी वेतनातील फरकाची रक्कम मिळण्याबाबत विनंती केली आहे.)

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१५</u>**

ग्रंथपाल हे पद शिक्षकेतर संवर्गातील आहे. परंतू डॉ. खंदारे यांनी आवश्यक ती अर्हता प्राप्त केली असल्याने बी.लिब्./एम.लिब्. अभ्यासक्रमांसाठी त्यांना तासिका तत्वावर निमंत्रित करावे व विद्यापीठ नियमांप्रमाणे त्यांना प्रवासभत्ता सोडून मानधन द्यावे. उर्वरित फरक किंवा जास्तीची रक्कम नियमाप्रमाणे देता येणार नाही.

१६. विद्यापीठातील ग्रंथपाल हे पद शिक्षक संवर्गात समाविष्ट करण्याबाबत विचार करणे. (इतर अभिमत विद्यापीठांमध्ये हे पद शिक्षक संवर्गात समाविष्ट आहे.)

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१६</u>**

यासंदर्भात शासनाकडे प्रयत्न करावा.

१७. शिक्षक निवासस्थान सदनिका वापराच्या मोबदल्याविषयी दि. १ जानेवारी २०१६ पासून अंमलात आलेल्या सुधारित दराने घरभाडे भत्ता आकारण्यासंदर्भात विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१७</u>**

शासनाच्या नियमांप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१८. शासन निर्णय क्र. प्ररजा-२०१०/(८६/१०) विशी-१ दि. ६ मार्च २०१० अन्वये महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेची मर्यादा ९० दिवसांवरुन १८० दिवस करण्याबाबत विचार करणे.

**<u>ठराव : व्य.मं.२०१६-१८</u>**

शासनमान्य महिला कर्मचाऱ्यांना प्रसुती रजेची मर्यादा १८० दिवस करण्यात यावी.

मा. अध्यक्षांच्या संमतीने आयत्या वेळचे विषय

१९. मास कम्युनिकेशन विभागात सहायक प्राध्यापक व टेक्निशियन पदावर योग्य उमेदवाराची निवड करण्याकरिता नियुक्त केलेल्या निवड समितीच्या दि. १८ डिसेंबर २०१५ रोजीच्या सभेतील शिफारसींची नोंद घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९**

नोंद घेण्यात आली.

२०. सन २०१६ मधील शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांसाठी जाहीर करण्यात आलेल्या सुट्यांना तसेच विभागीय आयुक्त पुणे आणि सोलापूर यांचेतर्फे जाहीर होणाऱ्या स्थानिक सुट्यांना मा. कुलगुरुंनी व्यवस्थापन मंडळाचे वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२०**

नोंद घेण्यात आली.

२१. मास कम्युनिकेशन विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या बी.ए. (जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन) अभ्यासक्रमातील विशेष प्राविण्य विषयांचे शुल्कात सन २०१६-१७ पासून सुधारणा करण्याबाबत विचार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२१**

बी.ए. (जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन) अभ्यासक्रमातील खालील विशेष प्राविण्य विषयांचे शुल्क सन २०१६-१७ पासून सुधारीत दराने घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. बी.ए. (जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन) : साऊंड इंजिनियरींग - रु. १,८५,०००/-
२. बी.ए. (जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन) : फिल्म मेकिंग - रु. १,६५,०००/-
३. बी.ए. (जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन) : फोटोग्राफी - रु. १,६५,०००/-
४. बी.ए. (जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन) : जर्नालिझम - रु. १,२५,०००/-
५. बी.ए. (जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन) : ॲडव्हर्टायझिंग, पब्लिक रिलेशन्स ॲण्ड मार्केटींग - रु. १,२५,०००/-

२२. जपानी भाषा अभ्यासक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या बी.ए.(जॅपनीज) विषयाच्या परीक्षा पध्दतीत सुधारणा करण्याबाबतच्या विनंतीस मान्यता देणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२२**

जपानी भाषा अभ्यासक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या बी.ए.(जॅपनीज) विषयाच्या परीक्षा पध्दतीत विभागाने सुचविलेल्या सुधारणा करण्याबाबतच्या सोबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

२३. ज्ञानदीप विद्यापीठ पुणे यांनी दि. १५ डिसेंबर २०१५ च्या पत्रांन्वये एम्.ए. आणि पीएच.डी. (फिलॉसॉफी) विषय त्यांचेतर्फे चालविण्यासंदर्भातील प्रस्तावावर विचार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२३**

सदरच्या प्रस्तावाकरिता डॉ. श्रीपाद भट यांचे अध्यक्षतेखाली अभ्यासक्रम नियोजन व आढावा समिती गठीत करण्यात यावी. या समितीने एक महिन्याच्या कालावधीत मा. कुलगुरुंना अहवाल सादर करावा. त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरुंना देण्यात येत आहे.

२४. विद्यापीठामार्फत होणाऱ्या शासनमान्य/ विद्यापीठ न्यास मान्य शिक्षक/शिक्षकेतर पदांसाठीचे नियुक्ती नियम(R.R) तसेच तत्संबधी इतर बाबी (जाहिरात, निवड समिती, निवड प्रक्रिया इ.) नियम मान्यतेसाठी सादर करणेबाबत

**<u>ठराव : व्य.मं.२०१६–२४</u>**

दिनांक १.१.२०१६ पासून प्रस्तुत शिक्षक/शिक्षकेतर पदांसाठीचे नियुक्ती नियम (R.R)आमलात आणावेत व त्यास अनुसरूनच भरती प्रक्रिया पूर्ण करावी तसेच एप्रिल–मे २०१६ पासूनचे परीक्षक नियुक्ती नियम सर्व अधिष्ठाता यांनी तयार करावेत. त्याअनुषंगिक परीक्षा भत्ते मानधन याबाबतही सर्व बाबी तयार करून मा.कुलगुरूंचे मान्यतेने परीक्षा विभागाने त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी.

सही / सही /

सचिव अध्यक्ष